दै. लोकमत दि. 19. 07. 24

मटक्या, गोगल्यासह तिघे ताब्यात : 'एसपीं'कडून झाडाझडती

# खूनांची मालिका संपता संपेना, आणखी एका तरूणास संपविले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत गेल्या चार दिवसांपासून खुनाची मालिका सुरूच आहे. हिलालनगर येथील सय्यद सलमानचा (दि.१४) खून झाला. त्यानंतर नवीन मुजामपेठ येथे १७ जुलैला पहाटे शेख शाहबाज याचा खून झाला तर या दोन्ही घटना ताज्या असताना १७ जुलैच्या रात्री बळिरामपूर येथे धारधार हत्याराने वार करून तरूणाचा खून करण्यात आला. खुनाच्या या घटनांमुळे नांदेड शहर हादरून गेले आहे.

भैय्यासाहेब ऊर्फ अमोल लांडगे (वय २६, रा. गौतमीनगर, बळिरामपूर) असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे. भैय्यासाहेब लांडगे हा (दि. १७) रात्री सात वाजल्यादरम्यान त्यांच्या घराजवळ थांबला होते. यावेळी दोन ते तीन आरोपीने धारधार हत्याराने त्यांच्या पोटावर, डाव्या छातीवर अनेक जबर वार केले. या हल्ल्यामध्ये भैय्यासाहेब लांडगे हे गंभीर जखमी होवून बेशुद्ध झाले. त्यांना नातेवाईकांनी उपचारासाठी विष्णूपुरी येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान बुधवारी रात्री साडेअकराच्या दरम्यान गंभीर जखमी अवस्थेतील भैय्यासाहेब लांडगे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी रामेश्वर लांडगे यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोंलिसांनी या खूनप्रकरणातील दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक सचिन गढवे, अंमलदार नामदेव सूर्यवंशी यांनी दिली.



## चार तासांतच आवळल्या आरोपींच्या मुसक्या

आरोपी प्रकाश उर्फ मटक्या मल्हारी जोगदंड रा.बळीरामपूर, दिपक उर्फ गोगल्या सुभाष गोडबोले, शंतनू नंदकिशोर देहाने या तिघांनीही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पूर्वीच्या भांडणातून या आरोपींनी अमोल लांडगे खंजरने वार करुन खून केला होता. त्यानंतर ते पसार झाले होते. परंतु, पोलिसांनी त्यांच्या चार तासातच मुसक्या आवळल्या.

## एसपी 'ऑन द स्पॉट'

१ जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्यासह पोलीस उपअधीक्षक डॅनीयल बेन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, गुन्हे शोध शाखेचे महेश कोरे, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने आदींनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.

२ खूनाच्या घटनेनंतर पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी थेट ठाणे गाठून ग्रामीण ठाण्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली. वाढती गुन्हेगारी रोखण्याच्या अनुषंगाने सूचना करत अधिकाऱ्यांना फैलावर घेतले.